I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** नातेपूते **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0052 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/02/2026 21:29 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 10/02/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 10/02/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:30 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:30 तास

2 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 18/02/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 18/02/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:56 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:43 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 18/02/2026 **Time (वेळ):** 20:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 018 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 18/02/2026 21:29 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** नातेपुते येथील दाते प्रशाले सम, नातेपुते,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**2.** **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 7 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मोरोची ग्रामपंचायत कार्यालय, मोरोची,माळशिरस

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6.** **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** शैलेश चंद्रकांत पवार

**(b)** **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1985 **(d) Nationality (राष्‍ट्रीयत्‍व):**भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, नातेपूते , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

| | | |
|---|---|---|
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभागसोलापू, नातेपूते , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9112121668

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती पुजा बाबासाहेब लोंढे | | | 1. Town/Village (शहर / गाव): दहिगांव,Tehsil (तहसील): माळशिरस,Police Station (पोलीस ठाणे): नातेपूते,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद तारीख 18/02/2026

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

मी. श्री. शैलेश चंद्रकांत पवार, वय - 41 वर्षे व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9657917317.

दि.09/02/2026 रोजी आम्ही कार्यालयात असताना, श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार श्री रविराज मारुती खुसपे, रा. 61 फाटा, दहा-दारे, माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत माहिती देवून लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दिनांक 10/02/2026 रोजी भेटण्यास बोलवले असल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने दि. 10/02/2026 रोजी पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही दि. 09/02/2026 रोजी आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय, गुरुनानक चौक, सोलापूर या कार्यालयास दि. 10/02/2026 रोजी सकाळी 07.30 वा पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार केला. त्याअनुषंगाने अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय, गुरुनानक चौक, सोलापूर कार्यालयाकडील दोन पंच सुमारे 07.30 वा चे सुमारास 1) अमजदखान नजीरअहमद पठाण, पद – प्रधान तंत्रज्ञ, नेम- ई उपविभाग, शाखा कार्यालय, गुरुनानक नगर, सोलापूर व 2) नंदकुमार हणमंतराव मार्तंडे, पद - वरिष्ठ तंत्रज्ञ, नेम- ई उपविभाग, शाखा कार्यालय, गुरुनानक नगर, सोलापूर हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख सांगुन तक्रारदार श्री रविराज मारुती खुसपे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मौजे मोरोची, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोहेकॉ/571 मुल्ला, पोहेकॉ/1616 जाधव, मपोकॉ/1772 व चापोहेकॉ/984 गायकवाड यांची दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, पिं्रटर, सील, अल्ट्रा व्हायोलेट दिवा

. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 08.15 वा एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनातून मी, पोहेकॉ/571 मुल्ला, पोहेकॉ/1616 जाधव, मपोकॉ/1772, दोन्ही पंच आणि चालक पोहेकॉ/894 गायकवाड असे आम्ही मौजे मोरोची, ता. माळशिरस, जि.सोलापूर येथे रवाना झालो. आम्ही रंगभवन, बाळे, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस मार्गे 10.45 वा चे सुमारास मौजे मारोची गावाचे अलिकडे नातेपुते-शिंगणापूरकडे जाणा-या रोडच्या बाजूला जावून थांबलो. दरम्यानच्या काळात आम्ही तक्रारदार खुसपे यांना मौजे मारोची गावाचे अलिकडे नातेपुते-शिंगणापूरकडे जाणा-या रोडच्या बाजूला येऊन थांबण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे तक्रारदार श्री खुसपे हे त्यांचेकडील चारचाकी वाहनास येवून थांबलेले होते. सदर इसमास आम्ही रविराज खुसपे का असे विचारले असता त्यांनी होकार दिला. त्यानंतर आम्ही पोहेकॉ/571 मुल्ला, पोहेकॉ/1616 जाधव, मपोकॉ/1772 व चापोहेकॉ/984 गायकवाड यांना वाहनातून उतरवून बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे सर्व अंमलदार हे वाहनातून उतरून बाहेर थांबल्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार खुसपे मी व पंच बसलेल्या शासकीय वाहनात येवून बसले. त्याठिकाणी

तक्रारदार खुसपे यांची माझी व दोन्ही शासकीय पंचाची ओळख करून दिल्यानंतर आम्ही त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रविराज मारूती खुसपे, वय 26 वर्षे, रा. 10 दारे, माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर शिक्षण- सिव्हील इंजिनिअरींग असे असल्याचे सांगून, त्यांचे परवानाधारक शासकीय बांधकाम ठेकेदार असून मी ग्रामपंचायत मार्फत केले जाणारे विविध कामाचे ऑनलाईन टेंडर भरून सन 2022 पासून काम करीत आहे.

मौजे मोरोची, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे शासनाचे 15 वा वित्त आयोग अंतर्गत श्री. तुपे यांचे घर ते मेनरोड मोरोची तसेच बनसोडे यांचे घर ते महादेव चव्हाण ते सुनिल झेंडे घर या दरम्यान बंदीस्त गटार या कामाचे मी ऑनलाईन टेंडर निविदा रक्कम 5,89,817/- रू च्या 0.03 टक्के कमी दराने भरलेले होते. सदरचे काम ग्रामपंचायत कार्यालय मोरोची यांचेकडील जा.क्र. 72/2025 दि. 03/04/2025 अन्वये कार्यारंभ आदेशान्वये मिळालेले होते. सदरचे काम मी दि. 18/12/2025 रोजी पुर्ण केलेले असून त्या कामाचे बीलाची एकुण रक्कम 5,27,880/- रू मला मिळालेली आहे.

त्यानंतर ग्रामपंचायत मोरोची यांचेकडून पांडुरंग खिलारवस्ती मोरोची येथील रस्त्याचे खडीकरणाचे कामाचे दि. 13/05/2025 रोजी ऑनलाईन टेंडर निघालेने सदरचे टेंडर मी ऑनलाईन टेंडर रक्कम 4,97,758/- रू. च्या दरापेक्षा 0.99 टक्के कमी दराने भरलेले होते. सदरचे काम ग्रामपंचायत कार्यालय मोरोची यांचेकडील जा.क्र. 74/2025 दि. 16/05/2025 अन्वये कार्यारंभ आदेशान्वये मिळालेले होते. सदरचे काम मी दि. 16/01/2026 रोजी पुर्ण केलेले असून त्या कामाचे बीलाची एकुण रक्कम 4,43,547/- रू. ग्रामपंचायत मोरोची यांचेकडे प्रलंबीत आहे.

वरीलप्रमाणे ग्रामपंचायत मोरोची यांचेकडे प्रलंबीत असलेले माझे बीलाचे रक्कम 4,43,547/- रू मिळणेचे अनुषंगाने मी दि.05/02/2026 रोजी मोरोची ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक श्रीमती लोंढे मॅडम यांची समक्ष भेट घेतली असता त्यांनी तुम्ही यापुर्वीही फुकटच काम करून घेतले त्याचे काहीच चहापाणी केलेले नाही. आत्ता दोन्ही कामाचे दयावे लागतील त्याशिवाय बील जमाच करणार नाही असे म्हणून यापुर्वी केलेले बंदीस्त गटारीचे कामाचे बील जमा केले म्हणून त्याचे 25,000/- रू व आत्ताचे खिलारवस्ती येथील रस्त्याचे खडीकरणाचे कामाचे बील जमा करणेसाठी 25,000/- रू दयावे लागतील असे म्हणून एकुण 50,000/- रू लाचेची मागणी केलेली आहे. सदरची लाच रक्कम ही श्रीमती लोंढे यांची इलेक्शन डयूटी झाल्यानंतर दि.10/02/2026 रोजी घेवून येण्यास सांगितले आहे. अशी थोडक्यात हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांना सदरची तक्रार त्यांचे स्व:हस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

लोकसेवक श्रीमती लोंढे यांनी तक्रारदार श्री. खुसपे यांना दि. 10/02/2026 रोजी मला बोलावले असल्याने तक्रारदार खुसपे हे मौजे. मोरोची, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे त्यांना भेटण्यास जाणार असल्याने तक्रारदार श्री. खुसपे यांचे तक्रारीनुसार लोकसेवक श्रीमती लोंढे यांचेवर लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याकरिता आम्ही तक्रारदार श्री. खुसपे व दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील व्हाईस रेकॉर्डर व पॅकिंग मधील 08 जीबी चे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगीतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. खुसपे यांचेकडे लोकसेवक श्रीमती लोंढे हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे

सर्वानुमते ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र. 1 म्हणुन अमदजखान नजीरअहमद पठाण पंच क्र. 2 म्हणून श्री. नंदकुमार हणमंतराव मार्तंडे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 पठाण पंच क्र. 02 मार्तंडे यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ईव्हिएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे पाकिटातून बाहेर काढले ते सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.

त्यानंतर तक्रारदार श्री. लोंढे व त्यानंतर पंच क्र. 1 श्री. पठाण पंच क्र. 02 श्री. मार्तंडे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 11.31 वा ची होती. सदरचे व्हिडीओ चित्रीकरण हे पोह/मुल्ला यांचे मोबाईलमध्ये करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार श्री. खुसपे यांना लोकसेवक श्रीमती लोंढे यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही उपस्थित

पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री. खुसपे यांचे शर्टाच्या आतील बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून व तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. पठाण यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांची पांढ-या रंगाची हयुदाई कंपनीची व्हेन्यु मोटार कार क्र. एम.एच-45-ए.एल-6080 मधून मौजे मोरोची येथील कार्यालय येथे रवाना केले त्यावेळी व्हाईसरेकॉर्डर चालू केला ती वेळ 11.45 वा ची होती. त्यानंतर आम्ही व पंच क्र. 02 मार्तंडे असे नातेपुते-शिंगणापूर रोड जवळच शासकीय वाहनामध्येे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 असे नातेपुते-शिंगणापूर रोड जवळच शासकीय वाहना जवळ परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 12.07 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र. 2 श्री. मार्तंडे यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, “मी व तक्रारदार खुसपे असे तक्रारदार यांचे मोटार कार मधून मौजे. मोरोची येथील ग्रामपंचाय कार्यालय येथे गेलो. तेथे मोटार कार ग्रामपंचायत कार्यालय मोरोची समोर लावून मी व तक्रारदार खुपसे असे लोकसेवक श्रीमती लोंढे बसत असलेल्या कक्षामध्ये गेलो, तेथे तक्रारदार खुपसे यांनी जावून लोकसेवक श्रीमती लोंढे यांची भेट घेवून ग्रामपंचायत मोरोची यांचेकडे प्रलंबीत असलेले तक्रारदार यांचे बीलाचे रक्कम 4,43,547/- रू मिळणेचे अनुषंगाने चर्चा केली त्यादरम्यान तक्रारदार- काय चाललय मॅडम.. लोकसेवक- चाललय.. काय म्हणताय तक्रारदार- दलित वस्ती… पांडुरंग खिलारे वस्ती लोकसेवक- मराठीत लिहलय का इंग्लिशध्ये लिहलय काय करणार हे जरा… चार लाख ब्याण्णव हजार.. चार लाख ब्याण्णव हजार आठशे तीस.. 42283 दाह टक्केच येवढ ठेवून घेतलय का …. तक्रारदार- हो बघा.. लोकसेवक- 4,43,547/- तक्रारदार- लई अजून हयच्यातन बी कटींग लागतीच लोकसेवक- कामाचे पध्दतीन होणारच.. तुम्हाला काम किती करायच तेबी दिलेले असत… घेते करून आज ..मलाच जाव लागल माळशिरसला तक्रारदार- बरं.. लोकसेवक- हे आदा केलेल बील हायत ना.. तक्रारदार- हं हे झालेल हाय लोकसेवक- आणि हयच्या वरच अदा केलेल कुठय दुसर… तक्रारदार- कोणत हयच्यावरच.. लोकसेवक- दोन्ही हय ती येगयेगळ बील काढली होती ना आपण 60 टक्केन तक्रारदार- देताना आपल्याला हेच बील दिलेल होत तुम्ही सोडताना तस सोडलं.. लोकसेवक- असं केलय काय.. तक्रारदार- हयहय लोकसेवक- 35539/- हयातल

02 लाख कायतर सोडल होत आणि हयातल 01 लाख 56 हजार... तक्रारदार- हं..हं... लोकसेवक- त्यची राहिलीच..त्यची हाय ती खिलारवस्तीची खडीकरण.. तक्रारदार- आताच्या.. लोकसेवक- हं तक्रारदार- हे कधी मग करताय.. लोकसेवक- कोण.. हयच उदया परवाच्या दिवशी… त्यानंतर लोकसेवक श्रीमती लोंढे यांनी हाताच्या इशा-याने नंतर फोन करण्यास सांगितल्याने त्यावर तक्रारदार- बरं असे म्हणून मी व तक्रारदार खुसपे असे त्यांचेकडील मोटार कारमधून नातेपुते-शिंगणापूरकडे जाणा-या रोडच्या बाजूस सापळापथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार खुसपे यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र. 01 पठाण यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर आमचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण ऐकले असता सदरचे संभाषण आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र. 01 हक्के व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी वरून तक्रारदार यांना लोकसेवक लोंढे यांचेकडे दि. 10/02/2026 रोजी पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना ग्रामपंचायत मोरोची यांचेकडे प्रलंबीत असलेले तक्रारदार यांचे बीलाचे रक्कम 4,43,547/- रू मिळणेचे अनुषंगाने लोकसेवक श्रीमती लोंढे यांचेशी चर्चा केली परंतु त्यावेळी त्यांचे कार्यालयात इतर काही लोक असलेने त्यांनी लाच रक्कमेचे अनुषंगाने काही एक बोलले नाही. तसेच त्यांनी हाताचे इशा-याने नंतर फोन करण्यास सांगितल्याने लोकसेवक श्रीमती लोंढे यांची पडताळणी कारवाईचे अनुषंगाने भेट घेण्याकरीता लोकसेवक श्रीमती लोंढे यांना फोन करणेबाबत सर्वानुमते ठरले. त्यानंतर माझे सुचनेवर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9270777007 फोनवरुन लोकसेवक श्रीमती लोंढे यांचे मोबाईल क्रमांक 9763793067 वर 11.41 वा फोन केला त्यावेळी लोकसेवक श्रीमती लोंढे- बोला की… तक्रारदार-म्हटल काय बोलाव नाही म्हटलं.. ती संग आबा हि होतं म्हणून मी पण काय बोलो नाही येणार आहे का नातेपुतेला कुंठ.. लोेकसेवक-हो येणार आहे की.. तक्रारदार-बंर..बरं.. ती इस्टीमेट पण बघीतल नाही… लोकसेवक- कोणतं.. तक्रारदार- ते त्यज्या दोन्ही कामाच्या ती म्हटलं..ती हया समोर बघु मग ते.. लोकसेवक-पांडुरंग खिलार वस्तीच व्हय.. तक्रारदार-हं..त्यात हया गटारीच पण.. लोकसेवक-बरं..बरं.. ठिका आहे चालेल बोलू आल्यावर.. तक्रारदार-हं..हं.. त्या.. कवाशी येणार पण.. लोकसेवक- एक तासभर आणखीन.. तक्रारदार- येवढा वेळ.. आहे.. लोकसेवक- किती वाजलेत आता जरा थोडसं काम होतं मला.. तक्रारदार-बरं..बरं.. चालत मग फोन करा मला येताना.. लोकसेवक- बंर..चालेल.. तक्रारदार- हं..हं नातेपुतेलाच येता का तिकडं येवू.. लोकसेवक- नातेपुतेच…नातेपुतेच येणार आहे.. तक्रारदार- चालेल..चालेल.. असे म्हणून फोन कट केला सदरचे मोबाईल वरील संभाषण आमचेकडील व्हाईसरेकॉर्डव्दारे ध्वनीमुद्रीत करून घेण्यात आले.

त्यानंतर लोकसेवक श्रीमती लोंढे या तक्रारदार यांना एक तासानंतर फोन करुन नातेपुते येथे भेटण्यास बोलवणार असल्याने तक्रारदार यांचे नातेपुते येथील सिध्दीविनायक डेव्हलपर्सचे कार्यालयात जावून थांबून राहवयाचे व लोकसेवक लोंढे हे नातेपुते येथे बोलविल त्या ठिकाणी पंच 01 पठाण यांचेसह पाठवून लाचेची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरवून, तक्रारदार श्री. खुपसे हे त्यांचेकडील मोटार कारने व आम्ही, पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे नातेपुते येथील सिध्दीविनायक डेव्हलपर्स कार्यालयात आलो.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंच असे तक्रारदार यांचे नातेपुते येथील सिध्दीविनायक डेव्हलपर्स कार्यालय येथे हजर असताना सुमारे 13.55वा लोकसेवक श्रीमती लोंढे यांचा त्यांचा मोबाईल क्रमांक 9763793067 वरुन तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक 9270777007 वर फोन आला व सदरचा फोन तक्रारदार यांनी उचलला लोकसेवक- हॅलो.. तक्रारदार- हा मॅडम.. लोकसेवक- कुठं थांबलात म्हटलं.. तक्रारदार-अं आता मांडव्यात आहे कि मॅडम... आलात का तुम्ही.. लोकसेवक-होय..होय.. तक्रारदार-अं..बरं आलो मग.. थोडया वेळात किती वेळ आहे.. लोकसेवक- या की पाच-दहा मिनिटांत.. तक्रारदार- बरं ठिक आहे... तुम्ही कुंठ आहे आता ..आलात.. लोकसेवक- हो रस्त्यात निघाले आले.. तक्रारदार- बरं..बरं ठिक आहे.. मग कुंठ येवू द्यात..लोकसेवक- भाऊसाहेबांच्या तिथं या.. तक्रारदार- कोणत्या.. लोकसेवक-बोरटे भाऊसाहेब.. तक्रारदार-बरं ठिक आहे असे म्हणून फोन कट केला. सदरचे फोनवरील संभाषण आमचेकडील व्हाईस रेकॉर्डव्दारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करुन घेण्यात आले आहे.

त्यानंतर लोकसेवक श्रीमती लोंढे यांनी तक्रारदार श्री. खुसपे यांना पाच ते दहा मिनीटांत बोरोटे भाऊसाहेबांचे तिथ म्हणजेच नातेपुते येथील माळशिरस-नातेपुते रोडवरील माने कॉम्लेक्स मधील खाजगी गाळयामध्येे बोलविले असल्याचे स्पष्ट झाल्याने तक्रारदार श्री. खुसपे यांचे तक्रारीनुसार लोकसेवक श्रीमती लोंढे यांचेवर लाच मागणीची अनुषंगाने पुन्हा एकदा पडताळणी कारवाई करण्याकरिता पंच क्र. 1 म्हणुन अमजदखान पठाणे पंच क्र. 2 म्हणून श्री. नंदकुमार मार्तंडे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 पठाण पंच क्र. 02 मार्तंडे यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा दाखवून त्यामध्ये यापूर्वी पडताळणी कारवाईतील संभाषण ध्वनिमुद्रीत झाले असलेची खात्री करून दिली. त्यानंतर तक्रारदार श्री. खुपसे व त्यानंतर पंच क्र. 1 श्री. पठाण पंच क्र. 02 श्री. मार्तंडे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 14.11 वा ची होती. सदरचे व्हिडीओ चित्रीकरण हे पोह/मुल्ला यांचे मोबाईलमध्ये करण्यात आले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री. खुसपे यांचे शर्टाच्या आतील बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून व तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. पठाण यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांची पांढ-या रंगाची हयुदाई कंपनीची व्हेन्यु मोटार कार क्र. एम.एच-45-ए.एल-6080 मधून नातेपुते येथील माळशिरस-नातेपुते रोडवरील माने कॉम्लेक्स येथे रवाना केले त्यावेळी व्हाईसरेकॉर्डर चालू केला ती वेळ 14.22 वा ची होती.

त्यानंतर आम्ही व पंच क्र. 02 मार्तंडे असे तक्रारदार यांचे नातेपुते येथील सिध्दीविनायक डेव्हलपर्स या कार्यालयात थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 असे तक्रारदार यांचे नातेपुते येथील सिध्दीविनायक डेव्हलपर्स या कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 14.56 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र. 2 श्री. मार्तंडे यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, “मी व तक्रारदार खुसपे असे तक्रारदार यांचे मोटार कारमधून नातेपुते येथील माळशिरस-नातेपुते रोडवरील माने कॉम्लेक्सकडे गेलो. तेथे मोटार कार माने कॉम्लेक्ससमोर लावत असताना लोकसेवक श्रीमती लोंढे यांचा 9763793067 वरुन तक्रारदार

यांचे मोबाईल क्रमांक 9270777007 वर फोन आला व सदरचा फोन तक्रारदार यांनी उचलुन तक्रारदार- हॅलो.. लोकसेवक श्रीमती लोंढे- आले नाहीत काय.. त्यावर तक्रारदार- आलो की मॅडम हित बोराटे भाऊसाहेबाच्या हित.. लोकसेवक- कुठ नाही हायत.. तक्रारदार- एकच मिनीट.. लोकसेवक- हॅलो... तक्रारदार- एक मिनीट आलो हे काय ... असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर मोटार कार माने कॉप्लेक्सच्या समोर लावून मी व तक्रारदार असे लोकसेवक श्रीमती लोंढे यांनी सांगितलेल्या बोराटे भाऊसाहे यांचे कार्यालयाकडे जात असताना त्या माने कॉम्लेक्समधील कॅफे क्रश जवळ उभ्या असल्याचे दिसल्या. त्यानंतर मी व तक्रारदार तेथे जावून लोकसेवक श्रीमती लोंढे यांची भेट घेतली व तक्रारदार यांनी भाऊसाहेबच आलेत.. त्यावर लोकसेवक श्रीमती लोंढे- आता चालले होते ते आले वाटतय इकडच तुम्हाला बघून.. असे म्हणत आम्ही तिघेहि माने कॉम्लेक्समधील कॅफे क्रशमध्ये गेलो सदरवेळी तक्रारदार यांनी लोकसेवक श्रीमती लोंढे यांना उद्‌देशून- बसा की असे म्हणाले त्यावर आम्ही सर्वजण कॅफे क्रशमध्ये बसलो त्यावेळी लोकसेवक- हं .. काय म्हणत होते बोलाकी.. असे म्हणाले त्यावर तक्रारदार- ते म्हणल कसं.. लोकसेवक- कशाच.. तक्रारदार- हयंच.. आता फक्त थोड फास्ट प्रोसेस करा... आणि भाऊसाहेबांना दयायला सांगा डिपॉझीट.. लोकसेवक- परवा.. परवा म्हणल की तुम्हाला.. तक्रारदार- डिपॉझीटच. ..... तुम्ही मगाशी.. लोकसेवक- हयंच पेमेन्ट दया की आधी... तक्रारदार- आं.. लोकसेवक- पेमेन्ट दया की आता हयंच.. तक्रारदार-मग तेच की... आजून म्हणलं कस काय ते.. लोकसेवक- कस काय तुम्हाला माहिती हाय की कस हाय ते.. तक्रारदार- आओ मॅडम तस नाही तुम्ही म्हणताय तस पण .. त्या ...(अस्पष्ट आवाज) . हाय का नाही... लोकसेवक- जर इस्टीमेटच्या रकमेन असत तर एक विचार केला असता आपण इस्टीमेटच्या रक्कमेच काय नाही.. तुम्हाला काढलेल्या रक्कमेच्या हयनच लावलय .. काय.. तक्रारदार- नाही नाही काढलेल्या रकमेला तर त येणारच हाय की.. लोकसेवक- हं.. तक्रारदार- त्यचा नाही विषय काय ... पण त्यंची.. लोकसेवक- ..(अस्पष्ट आवाज).. अस्टीमेटच्या रक्कमेलाच पैसे घेतात.. (अस्पष्ट आवाज).. तक्रारदार- हं हाय की.. मॅडम काम पण तुम्ही बघताय की कसाय.. तस कोण करतय काय.. मी कामपण तस केलेल नाय.. अस काय की बाबा त्या इस्टीमेटच्या पेक्षा अस काय काम पण कमी केलल नाही. अं... लोकसेवक- तुम्ही ते कराव लागतय त्यला काय पर्याय नाही.. मला माहित हाय की.. तक्रारदार- पर्याय नाही... बरं मी काय नाह म्हणत नाही मॅडम.. असं. (अस्पष्ट आवाज) व्यवस्थित धरा अण.. माझ काय म्हणण नाही...लोकसेवक- आता व्यवस्थिततच हाय सगळयाकडून घेते .. तस काय नसतं.. सगळे तसच देतात.. तक्रारदार- आं.. लोकसेवक- सगळे तसेच देतात ओ.. अस काय तुमचाच विषय नाही हाय.. तुम्हालाच एकटयाला असं काय म्हणणर नाही की.. तक्रारदार- नाही मॅडम आता बाकीचे आता काम करातेय की.. लोकसेवक- तुम्हाला आता सात - आठ टक्क्े अस काय म्हणलय का... नाही... आहे तेवढच सगळयांना .. सगळे जेवढे देतात तेवढच दया.. तक्रारदार- आता किती धरायच हयच.. लोकसेवक- पाच टक्क्े धरायच.. तक्रारदार- पाच टक्क्यान मॅडम... आता पाच टक्क्यान बघितल का किती होत्यात.. लोकसेवक- नाही बघितल... किती होतात.. तक्रारदार- बघाकी एक पाच च ... सव्वा पाच च एक बील हाय.. ते एक साधारणपणे चार ... चार लाखाच बील हाय.. लोकसेवक- सव्वा पाच आणि .. तक्रारदार- चार लाखाच निघत की चेक.. ते दलित वस्तीच.. लोकसेवक- हो.. अं.. तक्रारदार- चार निघतोय का.. पावणे चार निघतोय.. लोकसेवक- किती हाय टोटल बील... तक्रारदार- बील हाय.. लोकसेवक- चार

सत्ेचाळीस हाय ना.. तक्रारदार- हां.. नाही चार त्रेचाळीस असल.. लोकसेवक- चार त्रेचाळीस ... अं. चार निघल.. तक्रारदार- नऊ लाख रुपये... किती धरायच.. लोकसेवक- अं.. तक्रारदार- किती धरायच.. लोकसेवक- पाच न त्यला कुट.. कोण हाय.. तक्रारदार- कामगार .. पैसे लांबल्यामुळ लई अडचण झालीय मॅडम.. लोकसेवक- आता कशाला लांबवायच.. आता बील देवू या की.. तक्रारदार- काय घेणार मॅडम.. लोकसेवक- कॉफी .. कॉफी दे दोन.. कोल्ड कॉफी हाप.. तक्रारदार- किती.. लोकसेवक- सव्वीस पाचशे.. तक्रादार- आं.. लोकसेवक- सव्वीस पाचशे.. तक्रारदार- हयच किती.. लोकसेवक- सव्वीस पाचशे.. तक्रारदार- सव्वीस पाचशे.. लोकसेवक- हं.... तक्रारदार- आता हयच मॅडम किती .. अं.. हयच किती धरलेत...लोकसेवक- सव्वीस पाचशे.. तक्रारदार- सव्वीस पाचशे.. अनं.. तक्रारदार- कॅपॅसीटी .... हवका हे हयच... लोकसेवक- चार त्रेचाळीस पाचशे सत्तेचाळीस.. तक्रारदार- आता हयचा चेक किती निघणार दलितवस्तीचा.. लोकसेवक- दलित वस्तीचा पाच टक्के कटींग होतय बाकीच... तक्रारदार- अं... लोकसेवक- किती चार... तीस एक हजार कट होतील.. तक्रारदार- चार लाख.. लोकसेवक- हं.. पंचवीस हजार पर्यंत होईल जास्तीत जास्त.. तक्रारदार- कटींग.. लोकसेवक- हं.. जीएसटी वगैरे कट करून दिलाय का त्यतला.. तक्रारदार- नाही .. नाही.. नाही.. नाही.. लोकसेवक- हयच्यात कायच कटींग केली नाही का जीएसटी वगैरे... तक्रारदार- नाही.. तेच म्हणतोय ओ.. हे तीन सत्तर च्या रेंजमध्ये निघल बील... लोकसेवक- तीन लाखाच्या वर दोन टक्के जीएसटी वाढतो आहे याला..(अस्पष्ट आवाज) .. कटींग केलेल हाय.. तक्रारदार-हयच किती दयायच.. लोकसेवक- तेवढच.. तक्रारदार- आता हयच कस मॅडम तेवढ.. लोकसेवक- तेवढच अन कस होणार.. तेवढच होणार ना.. तक्रारदार-अन हयच.. ते तीन ... तीन पंचाहत्तर चा धरा की चेक हे..लोकसेवक- चारचा निघेतल की.. तक्रारदार- नाही निघणार.. बरं ते काय काय होईल काय हिकड तिकड.. तीन पंचाहत्तर चा धरला तर किती होतेत..लोकसेवक- चारचा धरला तर वीस हजर होतेत.. तक्रारदार- चार लाखाचा चेक धरला तर वीस हजार होतेत.. लोकसेवक- बरं राहू दया.. सव्वीस हजारच दया आता.. वरच सव्वीस पाच हजार आणि नंतर उदया बाकीचे राहीलेल्या दया परत.. दोन्ही करून टाका आज... मला पण गरज हाय.. तक्रारदार-मला दयाकी तेवढ बी वन करून .. दलित वस्ती मधल.. लोकसेवक- आगोदर दया की आज सगळ.. तक्रारदार- हं..हं.. हं... विषय पैशावरच येतोय सगळा... लोकसेवक- तुम्ही कशासाठी करताय.. तक्रारदार- बरं एक दहा मिनीटात आलो दुकानदारापासन एक... करतो मी...लोकसेवक- बरं या.. हाय मी बोराटे भाऊसाहेबाचे इत.. तक्रारदार- चालतय हां.. लोकसेवक- सगळ करा पण... तक्रारदार- सगळ नाय देणार.. लोकसेवक- नाही नाही नाही सगळे आणल्याशिवाय सोडतच नाही.. असे म्हणाल्यानंतर मी व तक्रारदार खुपसे असे त्यांचेकडील मोटार कारमधून वरुन नातेपुते येथील सिध्दीविनाय डेव्लपर्स कार्यालयात परत आलो असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार खुपसे यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र. 01 पठाण यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर आमचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र. 01 पठाण व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी वरून तक्रारदार यांना लोकसेवक श्रीमती लोंढे यांचेकडे पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी मौजे मोरोची,

ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे शासनाचे 15 वा वित्त आयोग अंतर्गत श्री. तुपे यांचे घर ते मेनरोड मोरोची तसेच बनसोडे यांचे घर ते महादेव चव्हाण ते सुनिल झेंडे घर या दरम्यान बंदीस्त गटार काम केले असून त्यांचे बीलाची रक्कम 5,89,817/- रू इतकी मिळाली असून त्यारक्कमेच्या 5 टक्के प्रमाणे होणारी रक्कम 26,500/-रु तसेच मौजे मोरोची येथील पांडुरंग खिलारवस्ती येथील रस्त्याचे खडीकरणाचे केलेल्याकामाचे बीलाची एकुण रक्कम 4,43,547/- रू. पैकी जीएसटी वगैरे कपात होवून मिळणा-या अंदाजे 4,00,000/- रु च्या पाच टक्के प्रमाणे 20,000/- रु असे एकूण 46,500/- लाचेची मागणी करुन पहिला हप्ता 26,500/- इतकी रक्कम आजच लवकर सदरची लाच रक्कम घेवून माळशिरस-नातेपुते रोडवरील माने कॉम्प्लेक्स मधील बोराटे भाऊसाहेब बसतात त्या कार्यालयात बोलावले असलेचे स्पष्ट झाले.

त्यानंतर लोकसेवक श्रीमती लोंढे यांचेविरूध्द सापळा कारवाई करणेचे अनुषंगाने आम्ही, पोहेकॉ/ 571 मुल्ला, पोह/1616 जाधव, मपोशि/1772 गायकवाड, चापोह/984 गायकवाड यांना तक्रारदार यांचे नातेपुते येथील सिध्दीविनायक डेव्हलपर्स कार्यालयात बोलावून त्यांची व तक्रारदार खुसपे यांची आपसात ओळख करून दिली व तक्रारदार खुसपे यांनी दिलेले तक्रारीवरून लोकसेवक श्रीमती लोंढे, ग्रामसेवक मोरोची ग्रामपंचायत, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांची पडताळणी केली असता त्यांनी 46,500/- रू लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता 26,500/-रु माळशिरस-नातेपुते रोडवरील माने कॉम्प्लेक्स मधील बोराटे भाऊसाहेब बसतात त्या कार्यालयात घेवून येणेस सांगितले असलेचे निष्पन्न झाल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार खुसपे तसेच सापळा पथकास सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार खुसपे यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लोकसेवक श्रीमती लोंढे यांना देणेसाठी म्हणून 500/- रू दराच्या 53 चलनी नोटा एकूण रक्कम 26,500/- रुपये हजर केले. त्यानंतर पोह/जाधव यांनी नमुद नोटांचे नंबर संगणकावर टाईप करून घेवून त्याची प्रिन्ट काढली व त्यावर आम्ही पंचांनी सहया करून तो कागद आमचेकडेच सुरक्षित ठेवला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समाजावून सांगून त्याबाबतचे प्रात्यक्षिक कार्यालयात कृत्रीम अंधार करुन दाखिवले. त्यानंतर सदरच्या चलनी नोटा पोह/1616 जाधव यांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, पोह/1616 जाधव यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस ॲन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर त्यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार खुसपे यांच्या नेसणीस असलेल्या शर्टच्या समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम"जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोहेकॉ/ 571 मुल्ला हे त्यांचेकडील मोबाईलमध्ये करणार असल्याचे सांगितले. तसेच सदर पडताळणी कारवाई मध्ये वापरलेले ईव्हीएम कंपनीचे मेमरी कार्ड पुढील सापळा कारवाईसाठी वापरण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये यापूर्वी पडताळणी कारवाईतील संभाषण ध्वनिमुद्रीत झाले असलेची

खात्री करून दिली.

त्यानंतर आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार खुपसे व दोन्ही पंचाचे निवेदने सदरचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनिमुद्रीत करून घेतले ती वेळ 15.48 वा ची होती. सदरचे व्हिडीओ चित्रीकरण हे पोह/मुल्ला यांचे मोबाईलमध्ये करण्यात आले.

त्यानंतर लोकसेवक श्रीमती लोंढे यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार खुसपे यांना सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर 15.58 वा. चालू करुन त्याचे शर्टाच्या आतील बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून शासकिय पंच क्र.1 श्री. पठाण यांचेसह तक्रारदार यांचेकडील पांढ-या रंगाची हयुदाई कंपनीची व्हेन्यु मोटार कार क्र. एम.एच-45-ए.एल-6080 मधून माळशिरस-नातेपुते रोडवरील माने कॉम्प्लेक्स येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकिय वाहन क्र. एम.एच. 12 यु.सी. 4108 या मधून रवाना झालो. माळशिरस-नातेपुते रोडवरील माने कॉम्प्लेक्सच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र. 02 तसेच सापळा पथक वाहनातून उतरून कार्यालयाच्या जवळ कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो. तक्रारदार व पंच क्र. 01 हे माळशिरस-नातेपुते रोडवरील माने कॉम्प्लेक्स मधील बोराटे भाऊसाहेब बसतात त्या कार्यालयात गेले. परंतु लोकसेवक श्रीमती लोंढे या कार्यालयात उपस्थित नसल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9270777007 वरुन लोकसेवक यांचे मोबाईल क्रमांक 9763793067 वर फोन केला असता त्यांचा फोन लागला नाही. तक्रारदार यांनी त्यांचे कार्यालयातील उपस्थित असलेले इसमांस लोकसेवक श्रीमती लोंढे यांची विचारणा केली असता त्यांनी लोंढे मॅडम आले नसल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी कार्यालयातील इसमास भाऊसाहेब कुंठ गेले असे विचारले असता त्यांनी माहित नसल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार खुपसे यांनी पुन्हा त्यांचे मोबाईल क्रमांक 9270777007 वरुन लोकसेवक यांचे मोबाईल क्रमांक 9763793067 वर फोन केला असता लोकसेवक श्रीमती लोंढे यांनी फोन उचलला त्यावेळी तक्रारदार हे हा कुठ आहेत मॅडम असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्रीमती लोंढे- नाही घरी आले जरा बघू बोलू नंतर... तक्रारदार- काय म्हणता.. लोकसेवक श्रीमती लोंढे- नंतर बोलू म्हटलं.. तक्रारदार- बरं..बरं.. बरं असे बोलून फोन कट केला त्यानंतर ते तक्रादार यांचे नातेपुते येथील सिध्दीविनायक डेव्हलपर्स कार्यालयात परत आले त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक देखील शासकीय वाहनाने परत आलो. त्यानंतर तक्रारदार खुसपे यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र. 01 पठाण यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर आमचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र. 01 पठाण व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा कारवाईच्या अनुषंगाने लोकसेवक श्रीमती लोंढे या फोन करुन बोलवतील त्या ठिकाणी सापळा कारवाई करण्याचे ठरवून तक्रारदार यांचे नातेपुते येथील सिध्दीविनायक डेव्हलपर्स कार्यालयात थांबून राहिलो. त्यानंतर बराच वेळ होवूनही लोकसेवक लोंढे यांचा फोन न आल्याने तसेच त्यांना वारंवार फोन केल्यास त्यांना संशय येईल म्हणून या नंतर लोकसेवक श्रीमती लोंढे या फोन केल्यानंतरच पुढील कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरवून आम्ही सापळा लाच रक्कम माझेकडे सुरक्षित ठेवून घेतली व तीच लाच रक्कम परत सापळा कारवाईत वापरण्यात येणार असल्याचे सांगितले व दि. 10/02/2026 रोजीची

सापळा कारवाई तुर्त स्थगित करण्यात आली.

